# Gramin Krishi Mausam Sewa

Experimental Block Level Agromet Advisory Bulletin
(A Joint Initiative of IMD & ICAR )

## Agromet Advisory Bulletin

**Date : 04-09-2020**

**Weather Forecast of UMRED Block in NAGPUR(Maharashtra) Issued On :2020-09-04(Valid Till 08:30 IST of the next 5 days)**

| Date (y-m-d) | Rainfall (mm) | Tmax (°C) | Tmin (°C) | RH I (%) | RH II (%) | Wind Speed (kmph) | Wind Direction (Degree) | cloud cover (Octa) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2020-09-05 | 0.8 | 34.3 | 24.8 | 82 | 56 | 5.0 | 203 | 4 |
| 2020-09-06 | 9.8 | 35.3 | 25.5 | 85 | 57 | 5.0 | 246 | 7 |
| 2020-09-07 | 0.8 | 35.4 | 25.4 | 83 | 55 | 6.0 | 279 | 7 |
| 2020-09-08 | 12.2 | 34.6 | 25.4 | 85 | 58 | 8.0 | 281 | 8 |
| 2020-09-09 | 9.4 | 34.8 | 25.0 | 88 | 59 | 8.0 | 289 | 8 |

### Weather Summary/Alert:

In Umred block, as per forecast given by RMC, Nagpur, from 05/09/2020 to 09/09/2020 weather will be partially to mostly cloudy. On 05th and 07th September very light rainfall and 06th, 08th and 09th September light rainfall is forecasted.

उमरेड तालुक्यामध्ये, प्रादेशिक हवामान केंद्र नागपूर च्या अंदाजानुसार दिनांक ०५/०९/२०२० ते ०९/०९/२०२० पर्यंत हवामान आंशिक ते मुख्यतः ढगाळ राहील. दिनांक ०५ आणि ०९ सप्टेंबर रोजी अति हलका पाऊस, ०६, ०८ आणि ०९ सप्टेम्बर रोजी हलका पाऊस होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

### General Advisory:

Farmers are advice to carry out matured crop in clean and dry day and store in safe and dry place, also advice to spraying of different agro chemicals and fertilizer application in standing crop should be done in clean and dry day. In green and black gram, where 70-75 % of the pods are mature, the crop should be harvested in dry day and stored in a safe place.

शेतकरी बांधवांनी परिपक्व झालेल्या पिकाची काढणी कोरड्या दिवशी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. तसेच पावसाच्या उघाडीचा दिवस पाहूनच फवारणी आणि उभ्या पिकात खते देण्याची कामे करावी. पूरग्रस्त भागात शेतात साचलेल्या पाण्याचा निचरा करावा. मूग आणि उडीद पिकामध्ये ज्या ठिकाणी 70-७५ टक्के शेंगा परिपक्व झाल्या असेल तेथे उघडीचा दिवस पाहून पिकाची काढणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.

### SMS Advisory:

Farmer are advice to take care of self and cattle as thunderstorm accompanied with lightning very likely to occur at isolated places is forecasted on 04th and 05th September.

दिनांक ०४ आणि ०५ सप्टेम्बर रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट पुर्वानुमानीत असल्याने शेतकरी बांधवांनी स्वतःची आणि जनावरांची काळजी घ्यावी.

### Crop Specific Advisory:

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| SOYABEAN | In the view of present cloudy and rainy weather, If the incidence of yellow vein mosaic virus disease is noticed on soybean crop, it is advised to remove and destroy infested plants showing yellow vein mosaic virus. Spraying should be done of Thiamethoxam 25 WG @ 100 gm per 500 litre of water per hectare at the appearance of symptoms. For control of diseases like Anthracnose and Rhizoctonia Aerial Blight, farmers are advised to spray the crop with Tebuconazole (625 ml/ha) or Tebuconazole + Sulphur (1 kg/ha) or Pyroclostrobin 20 WG (500 g/ha) or Hexaconazole 5% EC (800 ml/ha). |

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| | सद्य स्थितीत ढगाळ हवामानामुळे सोयाबीन पिकामध्ये पिवळ्या मोझेक रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास, प्रादुर्भाव ग्रस्त झाडे काढून टाकून शेताबाहेर नष्ट करावी व प्रसार पांढऱ्या माशी च्या नियंत्रणासाठी थायमेथोक्झाम २५ डब्ल्यूजी. १०० ग्राम प्रती ५०० लिटर पाणी प्रती हेक्टर या प्रमाणात घेऊन उघडीचा दिवस बघून फवारणी करावी. अन्थ्राक्नोज आणि रायझोक्टोनिया एरिअल ब्लाईट (पाने आणि शेंगावरील करपा- बुरशीजन्य रोग) रोगाच्या व्यवस्थापनासाठी टेबुकोनाझोल (६२५ मिली प्रती हेक्टर) किंवा टेबुकोनाझोल + सल्फर (१ किलो प्रती हेक्टर) किंवा पायराक्लोस्ट्रोबीन २० डब्लूजी (५०० ग्राम प्रती हेक्टर) किंवा हेक्झाकोनाझोल ५ % ईसी (८०० मिली प्रती हेक्टर) ५०० ते ७५० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| COTTON | Erect 2 Pheromone traps per hectare for monitoring of Pink bollworm infestation. Rosette flowers should be plucked and destroyed. in the view of present cloudy condition if Pink bollworm incidence crosses ETL (10% infestation), spray Profenophos 50 EC @ 20 ml or Thiodicarb 75 WP @ 20 g per 10 litre of water. The farmers are suggested to undertake spot drenching of carbendazim 50 % WP@ 20g+urea 100 g per 10 litres of water or Trichoderma harzianum or T. viridae @10 g/ litres of water should be done for management of wilt and root rot affected crop. |
| | गुलाबी बोंड अळीच्या निरीक्षणासाठी प्रती एकर दोन फेरोमोन सापळे लावावेत. प्रादुर्भाव ग्रस्त डोमाकळी काढून नष्ट कराव्या. सद्यस्थितीतील ढगाळ वातावरणामुळे गुलाबी बोंड अळीने आर्थिक नुकसान पातळी गाठल्यास (१० % नुकसान) प्रोफेनोफॉस ५० % ईसी २० मिली किंवा थायोडीकार्ब ७५ डब्लू.पी. २० ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कपाशीमध्ये आकस्मिक मर आणि मुळकुज दिसून आल्यास नियंत्रणासाठी कार्बेन्डाझीम ५० टक्के डब्ल्यू. पी. २० ग्राम + १०० ग्राम युरिया प्रती १० लिटर पाण्यात मिसळून आळवणी करावी किंवा ट्रायकोडर्मा हर्झीयानम किंवा ट्रायकोडर्मा व्हीरिडी १० ग्राम प्रती लिटर पाण्यात मिसळून ज्या ठिकाणी प्रादुर्भाव दिसून आला त्याठिकाणी आळवणी करावी. |
| RICE | In the view of present cloudy weather, if blast disease in notice on crop, for management of blast, spray Hexaconazole 5% EC @ 20 ml. or Isoprothiolane 40% E.C @ 15 ml or Tebuconazole 25.9% EC @ 15 ml per 10 liters of water. For management of bacterial leaf blight, spray Copper hydroxide 53.8% DF @ 30 gm + Streptocycline 1 to 1.5 gm per 10 liters of water. For management of sheath blight, spray Tebuconazole 25.9% EC @ 15 ml or Propiconazole 25% EC @ 10 ml or Hexaconazole 5 EC @ 20 ml by mixing in 10 liters of water. |
| | सद्य परिस्थितीतील ढगाळ वातावरणामुळे धान पिकात करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी हेक्झाकोनॅझोल ५ टक्के ई.सी. @ २० मि.ली. किंवा आयसोप्रोथिलेन ४० टक्के ई.सी. @ १५ मि.ली. किंवा टेबूकोनॅझोल २५.९ ई.सी. @ १५ मिलीप्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कडाकरपा रोगाच्या व्यवस्थापनासाठी कॉपर हैड्रॉकसाईड ५३.८ % टक्के डी एफ @ ३० ग्रॅम + स्ट्रेप्टोसायक्लीन @ १ ते १.५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पर्णकोष करपा रोगाच्या व्यवस्थापनासाठी टेबूकोनॅझोल २५.९ ई.सी. @ १५ मि.ली. किंवा प्रोपिकोनॅझोल २५ ई.सी. @ १० मि.ली. किंवा हेक्झाकोनॅझोल ५ ई.सी. @ २० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| GREEN GRAM | Where 70-75 % of the pods are mature, the crop should be harvested in dry day and stored in a safe place. |
| | मूग- ज्या ठिकाणी 70-७५ टक्के शेंगा परिपक्व झाल्या असेल तेथे उघडीचा दिवस पाहून पिकाची काढणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| BLACK GRAM | Where 70-75 % of the pods are mature, the crop should be harvested and stored in a safe place. |
| | उडीद- ज्या ठिकाणी ७०-७५ टक्के शेंगा परिपक्व झाल्या असेल तेथे घडीचा दिवस पाहूनपिकाची काढणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |

## Horticulture Specific Advisory:

| Horticulture (Varieties) | Horticulture Specific Advisory |
|---|---|
| ORANGE | On Nagpur mandarin, Phytopthora Brown Rot is noticed, for management of this, spraying should be taken of Fosetyl-Al or Mefenoxam at the rate of 2.5 gram per litre of water. To check fruit drop of Ambia bahar spray the santra trees with 1.5 gms 2, 4-D or gibberelic acid (GA). 100 gms carbendazim 50 wp with 1 kg urea in 100 litres of water. Repeat the spray after 15 days if the fruit drop continues. |
| | |

| Horticulture (Varieties) | Horticulture Specific Advisory |
|---|---|
| | नागपुरी संत्र्यावर फायटोप्थोरा ब्राऊन रॉट रोगाचा प्रादुर्भाव दिसून आला असल्याने प्रादुर्भाव ग्रस्त फळबागांमध्ये फोसेटील अल्युमिनिअम किंवा मेफेनोक्झाम २.५ ग्राम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आंबिया बहारच्या फळ गळ रोखण्यासाठी संत्राच्या झाडाला १.५ ते २ ग्रॅम २-४ डी किंवा गिब्रेरेलिक ऍसिड(जीए)ची संत्राच्या झाडाला फवारणी करावी. १०० लिटर पाण्यात १ किलो युरियासह 100 ग्रॅम कार्बेन्डाझिम ५० % डब्लू. पी. ची फवारणी करावी तसेच फळ गळ कायम राहिल्यास पुन्हा 15 दिवसांनी दुसरी फवारणी करावी. |
| SWEET ORANGE | On Nagpur mandarin, Phytopthora Brown Rot is noticed, for management of this, spraying should be taken of Fosetyl-Al or Mefenoxam at the rate of 2.5 gram per litre of water. To check fruit drop of Ambia bahar spray the santra trees with 1.5 gms 2, 4-D or gibberelic acid (GA). 100 gms carbendazim 50 wp with 1 kg urea in 100 litres of water. Repeat the spray after 15 days if the fruit drop continues. |
| | नागपुरी संत्र्यावर फायटोप्थोरा ब्राऊन रॉट रोगाचा प्रादुर्भाव दिसून आला असल्याने प्रादुर्भाव ग्रस्त फळबागांमध्ये फोसेटील अल्युमिनिअम किंवा मेफेनोक्झाम २.५ ग्राम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आंबिया बहारच्या फळ गळ रोखण्यासाठी संत्राच्या झाडाला १.५ ते २ ग्रॅम २-४ डी किंवा गिब्रेरेलिक ऍसिड(जीए)ची संत्राच्या झाडाला फवारणी करावी. १०० लिटर पाण्यात १ किलो युरियासह 100 ग्रॅम कार्बेन्डाझिम ५० % डब्लू. पी. ची फवारणी करावी तसेच फळ गळ कायम राहिल्यास पुन्हा 15 दिवसांनी दुसरी फवारणी करावी. |
| ACID LIME | For management of citrus canker in Acid lime hence the affected leaves and branches should be pruned and burnt. Spray Copper Oxychloride 180 gms with Streptocycline 6 gms in 60 liters of water. |
| | लिंबू पिकातील खैरया रोगाच्या व्यवस्थापनासाठी प्रादुर्भाव ग्रस्त पाने आणि फांद्या काढून नष्ट कराव्या तसेच कॉपरऑक्सिक्लोराईड १८० ग्राम आणि स्ट्रेप्टोसायक्लीन ६ ग्राम ६० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

**Livestock Specific Advisory:**

| Livestock(Varieties) | Livestock Specific Advisory |
|---|---|
| BUFFALO | Keep animal shed clean, dry and well ventilated. Deworming should be done, if not done earlier within 3 months. Disinfection/fumigation of shed should be done by using formalin. Sprinkle lime powder and saw dust on floor of shed on floor to minimize moisture and microbial load. Include dry fodder/feed in the diet of small and large ruminants to avoid diarrhea/indigestion. Provide complete ration to the livestock. Apply recommended doses of fertilizers to fodder crop. |
| | जनावरांचा गोठा हा स्वच्छ, कोरडा व हवेशीर ठेवा. जंतनाशकाची मात्रा ३ महिन्यांच्या आधी केली नसल्यास जनावरांना जंतनाशकाची मात्रा द्यावी. गोठ्याचे निर्जंतुकीकरण २ टक्के फार्मेलिन चे द्रावण तयार करून करावी. ओलावा आणि सूक्ष्मजीव भार कमी करण्यासाठी गोठ्याच्या पृष्ठभागावर चुना पावडर आणि लाकडाचा भुसा टाकावा. जनावरांमध्ये अतिसारआणि अपचन टाळण्यासाठी लहान आणि मोठ्या जनावरांना कोरडा चाऱ्याचा आहारात समावेश करावा. चारा पिकासाठी शिफारस केलेली रासायनिक खतांची मात्रा द्यावी. |
| GOAT | Vaccinate the goat against FMD, HS, PPR and enterotoxaemia. |
| | शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. |
| COW | For control of Lumpy Skin disease (LSD), Affected livestock shall be segregated from healthy livestock's. Movement (to and fro) of livestock from disease prone area shall be prohibited. Veterinary doctors treating infected livestock shall wear apron, wash hands with alcoholic sanitizers, foots-wears and apron shall be disinfected after treatment with hot water. The vehicle and premises were where affected livestock is kept along with other utensils shall be disinfected. For control of disease control of flies, ticks, mosquitoes shall be done. Spray Chemical/ herbal insecticides on animals body and in the premises. Due care shall be followed to avoid poisoning to livestock. |

| Livestock(Varieties) | Livestock Specific Advisory |
| --- | --- |
| | लम्पी स्क्रीन रोग व्यवस्थापनासाठी रोगबाधीत पशुधन निरोगी पशुधनापासून विलगीकरण करावे अथवा त्यांना एकत्रित चरावयास सोडू नये. रोगबाधीत पशुधनाची ने-आण बंद करावी. तसेच साथीच्या काळात गावातुन/परिसरातुन गोठयास भेट देणा-यांची संख्या मर्यादीत करावी. बाधीत पशुधनाची शुश्रृषा करणा-या पशुवैदयक डॉक्टरांनी विशिष्ट पोषाख परिधान करावा. शुश्रृषा केल्यानंतर हात अल्कोहोल मिश्रीत सॅनिटायझरने धुवून टाकावेत. तसेच पादत्राने व पोषाख, गरम पाण्याने निर्जंतुक करुन घ्यावा. बाधीत पशुधनाच्या संपर्कामध्ये आलेले वाहन व परिसर तसेच इतर साहित्य निर्जंतुक करावे. रोग नियंत्रणासाठी रक्तपिपासू चावणा-या किटकवर्गीय माशा, डास, गोचीड यांचे निर्मुलन करावे. पशुधन व परिसरावरती रासायनिक/ वनस्पतीजन्य किटकनाशकांची फवारणी करावी. |

## Others(Soil Testing/Conservation /Land Preparation Specific Advisory:

| Others(Soil Testing/Conservation /Land Preparation(Varieties) | Others(Soil Testing/Conservation /Land Preparation Specific Advisory |
| --- | --- |
| PLANT PROTECTION | Cotton- In the view of present cloudy and rainy weather, if the sucking pest reaches above ETL, spray Flonicamid 50 WG 4 gm or Dinotefuran 20 % SG 3g/10 lit of water. |
| | कपाशी- सद्य स्थितीत ढगाळ आणि पावसाच्या हवामानामुळे जर रसशोषक किडीने आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास फ्लोनिक्यामिड ५० डब्ल्यूजी. ४ ग्राम किंवा डीनोटेफ्युरान २० % एसजी. ३ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| PLANT PROTECTION | Soybean- For management of girdle beetle in soybean spraying should be taken of Thiacloprid 240 SC (21.7% w/w) (750 ml/ha) or Profenophos 50 EC (1250 ml/ha) or pre-mixed formulations like Betacyfluthrin + Imidacloprid (350 ml/ha) or Thiomethoxam + Lambda Cyhalothrin (125 ml/ha). If the incidence of green semilooper in soybean crop and exceeds the level of economic threshold (four larvae per meter crop line), spraying should be taken of Profenophos 50 EC 20 ml or Chlorantraniliprol 18.5 SC 3 ml or Indoxacarb 15.8 AC 6.6 ml or Thimethoxam 12.6 + Lambda cyhalothrin 9.5 ZC 2.5 ml per 10 liters of water. |
| | सोयाबीन- सोयाबीन मध्ये चक्री भुंगा किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास थाइक्लोप्रिड २४० एससी. (२१.७ डब्लू.डब्लू.) (७५० मिली/ हेक्टर) किंवा प्रोफेनोफोस ५० ईसी (१२५० मिली/हेक्टर) किंवा पूर्व मिश्रित रासायनिक कीटकनाशक बीटासायफ्ल्यूथ्रीन + इमिडाक्लोप्रिड (३५० मिली/हेक्टर) किंवा थायोमेथॉक्सम + लँबडा सायहॅलोथ्रिन (१२५ मिली / हेक्टर) या प्रमाणात फवारणी करावी. सोयाबीन पिकातील हिरव्या उंटअळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी (चार अळ्या प्रती मीटर पिकाची ओळ) ओलांडत असल्यास नियंत्रणासाठी प्रोफेनोफोस ५० ईसी २० मिली किंवा क्लोरानट्रॅनिलिप्रोल १८.५ टक्के एस.सी. ३ मिली किंवा इंडोक्झाकार्ब १५.८ ए.सी. ६.६ मिली किंवा थायमेथोक्झाम १२.६ + लँबडा सायहॅलोथ्रिन ९.५ टक्के २.५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी |
| GENERAL ADVICE | Farmers should take necessary precautionary measures while spraying insecticide, fungicide etc. |
| | शेतकरी बांधवांनी कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादींची फवारणी करताना स्वतःची योग्य ती काळजी/खबरदारी घ्यावी. |